नि. फौ. ख. क्र. ७३/२०१७ निशाणी ४३

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – राधेश्याम शंकरलाल चितलांगे

वय – ६० वर्षे, व्यवसाय – शेती

पत्ता – निंबा, ता. बाळापूर, जि. अकोला.

**सरकार तर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. आर.लोखंडे यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. घटना दि. २४.१२.२०१६ रोजी रात्री घडली. त्या दिवशी मी आणि माझी पत्नी घरातील एका खोलीत झोपलो होतो. सकाळी उठल्यावर आमच्या घरातील दुसरी खोली उघडी दिसली आणि त्या खोलीतील कपाट आणि अलमाऱ्या उघडया दिसल्या. तसेच चौक मधुन वर जाण्याचा रस्ता उघडा दिसला. कोणीतरी अज्ञान इसमाने चोरी केल्याचे आम्हाला समजले. चोराने माझ्या गळयातील अंदाजे ७–८ ग्रामची सोन्याची चेन, माझे पत्नीचे अंदाजे ३.५ ग्रॅमचे सोन्याचे मंगळसुत्र, ६ सोन्याच्या अंदाजे १५ ग्रॅमच्या अंगठया, ४ सोन्याच्या अंदाजे ७ ग्रॅमच्या बांगडया, चांदीचे पायल, नगदी रक्कम रु. १२ ते १५ हजार आणि एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल चोरुन नेले होते. सदर घटनेचा रिपोर्ट मी पोलीस स्टेशनला दिला होता. आता मला रिपोर्ट दाखविण्यात आला. तो तोच असुन, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.४४** देण्यात येत आहे. आता मला प्रथम छापील खबर दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.४५** देण्यात येत आहे. चोरी झाल्यानंतर पोलीस घरी आले होते. त्यांनी जागेची पाहणी केली.

२. रिपोर्ट दाखल झाल्यानंतर पोलीसांच्या तपासणीवरुन मला समजले की, माझा मोबाईल राष्ट्रपाल नावाच्या व्यक्तीकडुन एका महिलेने घेतला होता. चोरी गेलेल्या वस्तुंपैकी ६ सोन्याच्या अंगठया, २ सोन्याच्या बांगडया, सोन्याचे मंगळसुत्र आणि सोन्याची चेन तसेच मोबाईल मला सुपुर्तनाम्यावर मिळाले आहे. २ सोन्याच्या बांगडया आणि नगदी रक्कम अद्याप मिळालेली नाही. मला मिळालेल्या वस्तु कोणाकडुन जप्त केले त्याबद्दल पोलीसांनी मला काही सांगितले नाही. तपासा दरम्यान पोलीसांनी माझा जबाब नोंदविला होता.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्रीमती एच.बी.टिकार यांच्या मार्फत</u>**

३. माझी शेती निंबा येथे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शेतात राष्ट्रपाल कामाला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझे आणि राष्ट्रपाल यांचेत कामाबाबत वाद झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, राष्ट्रपालची आई माझ्या शेतात कामावर येत होती. रात्री आम्ही सर्व दरवाजे बंद करुन झोपलो होतो. मला निंबा येथुन पोलीस स्टेशन, उरळ येथे जाण्यासाठी भरपुर ऑटो उपलब्ध असतात. मी ऑटोने १५–२० मिनिटात उरळ पोलीस स्टेशनला पोहोचु शकतो.

४. माझे रिपोर्ट आणि बयानात माझ्या घराला वर जाण्यासाठी रस्ता असलेबाबत मी पोलीसांना सांगितले होते. मी रिपोर्ट आणि बयानात माझे ४०–४५ ग्रॅमचे सोन्याचे दागीने चोरी गेल्याचे सांगितले होते.हे म्हणणे खरे नाही की, माझे आणि आरोपीचे शेताच्या कामाबद्दल वाद झाल्यामुळे मी त्याच्या विरुध्द खोटा रिपोर्ट दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.09.16 11:21:41 +0530

बाळापूर. (श्रीमती डी. एम. पाटील)
दि.१५/०९/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर

<u>नि. फौ. ख. क्र. ७३/२०१७</u> निशाणी ४६

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. २ यांचा जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – अनंता वासुदेव थोटे

वय – ३९ वर्षे, व्यवसाय – शेती

पत्ता – निंबा, ता. बाळापूर, जि. अकोला.

**<u>सरकार तर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. आर.लोखंडे यांचे मार्फत सरतपास सुरुः</u>**

१. दि. २५.१२.२०१६ रोजी पोलीसांनी मला फिर्यादीच्या घरी बोलविले होते. फिर्यादीच्या घरी पोलीसांनी पंचनामा केला होता. मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ४७** देण्यात येते. दि. ०९.०२.२०१७ रोजी मी कुठे गेलो होतो मला आठवत नाही.

**(साक्षीदाराने त्याचे मुळ कथनाशी विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन उलट तपास स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी दिली.)**

२. दि. ०९.०२.२०१७ रोजी पोलीसांनी मला पोलीस स्टेशन, उरळ येथे बोलविले होते. त्यावेळी आरोपी राष्ट्रपाल पोलीसांच्या ताब्यात होता. त्यावेळी आरोपीने पोलीसांना माझे समोर त्याने त्याच्या घरी लपवलेला काही मुद्देमाल काढुन देतो असे निवेदन दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी, पोलीस आणि शिवानंद फुंडकर असे सर्व आरोपीच्या घरी गेलो तेव्हा आरोपीने माझ्या समक्ष सोन्या चांदीच्या वस्तु – १ पोत, १ बिंदी, १ ज्योती, १ चेनपट्टयाचा जोड, ६ अंगठया, ५ बिछवे, १ गोफ आणि जोडवे असा सर्व मुद्देमाल काढुन दिला. पोलीसांनी माझ्या समक्ष सदर वस्तु जप्त करुन जप्ती पंचनामा तयार केला. मला निवेदन आणि जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्या दोन्ही माझ्या सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **नि.क्र. ४८ व ४९** देण्यात येते. सदर दोन्ही पंचनाम्यावर आरोपीने माझ्या समक्ष सही केली होती.

३.		दि. १०.०२.२०१७ रोजी पोलीसांनी मला पोलीस स्टेशन, उरळ येथे बोलविले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने माझ्या समक्ष त्याच्या घरी ठेवलेला उर्वरित मुद्देमाल काढुन देतो असे निवेदन दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी, पोलीस आणि दुसरा पंच शिवानंद फुंडकर असे सर्व आरोपीच्या घरी गेलो तेव्हा आरोपीने माझ्या समक्ष २ अंगठया आणि कानातले काढुन दिले. सदर वस्तु जप्त करुन पोलीसांनी पंचनामा तयार केला. मला निवेदन आणि जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्या दोन्ही माझ्या सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **नि.क्र. ५० व ५१** देण्यात येते. सदर दोन्ही पंचनाम्यावर आरोपीने माझ्या समक्ष सही केली होती. दि. ०८.०२.२०१७ रोजी पोलीसांनी निंबा गावातुन देवानंद परघरमोर या व्यक्तीकडुन एक सॅमसंग मोबाईल माझे समक्ष जप्त केला. मला सदर जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी आणि देवानंद परघरमोर यांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ५२** देण्यात येते. दि. ०९.०२.२०१७ रोजी पोलीसांनी माझे समक्ष आरोपीचा भाऊ राहुल तायडे याचे कडुन एक सिल्व्हर रंगाचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल जप्त केला. मला सदर जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी आणि राहुल तायडे यांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ५३** देण्यात येते. मी आरोपी राष्ट्रपाल तायडे यास ओळखतो. तो आजरोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्रीमती एच.बी.टिकार यांच्या मार्फत**

४.		हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी पंचनाम्यासाठी हजर राहणेकरीता कोणतीही लेखी नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्यावेळी सहया केल्या त्यावेळी सर्व दस्तावेज लिहिलेले होते, मी फक्त सहया केल्या. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यात नमुद सोन्या चांदीचे दागीने आणि मोबाईल मी स्वतः पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी फिर्यादी सोबत आलेलो आहे. माझे आणि फिर्यादीचे घर एकाच मोहल्ल्यात आहे.

प्रश्न – तुमचे फिर्यादीसोबत चांगले संबंध आहेत ?

उत्तर – माझे सर्वांसोबत चांगले संबंध आहेत.

५.  हे म्हणणे खरे नाही की, माझे समक्ष पंचनामा झाला व वस्तु जप्त झाल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपुर्ण मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.09.16 11:21:48 +0530

बाळापूर.
दि.१५/०९/२०२५

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर